# संविधानाचा जागर

## - सीन 1 -

*(सर्व जण गोलात फिरत गाणे म्हणतात)*
संविधानाचा जागर मांडला जागराला या या
समतेचा जागर मांडला जागराला या या
बंधुतेचा जागर मांडला जागराला या या
स्वातंत्र्याचा जागर मांडला जागराला या या
न्यायाचा हा जागर मांडला जागराला या या
कॉलेजमधल्या मुलामुलींनो जागराला या या
वस्तीमधल्या आयाबायांनो जागराला या या
जागराला या तुम्ही जागराला या या
जागराला या तुम्ही जागराला या या

..............– अरे हो हो हो हो. दिवसाढवळ्या सगळे जागे असताना कशासाठी आन् कुणासाठी हा जागर मांडलाय!

.............. – इथे कोणी झोपलं नाहीये... सगळे जागे आहेत !

.............. – संविधानाचा जागर? संविधान?

**सगळे:** हो हो, संविधानाचा जागर!

.............. – पण काय आहे संविधान?

.............. – हा काही धानाचा प्रकार आहे का? .. गहू, ज्वारी, बाजरी सारखे हे काही धान्य आहे का?

.............. – (हसत हसत म्हणतेय) मला वाटलं एका बाईचं नाव आहे..

.............. – देव आहे की दानव आहे? पशू आहे की मानव आहे?

**सगळे:** काय आहे संविधान? काय आहे संविधान?

.............. – बरं, सांगते

आपला जन्म कुठे झाला? – सगळे: भारतात

आपण राहतोय कुठे? – सगळे: भारतात

खातोय कुठे? – सगळे: भारतात

शिकतोय कुठे? – सगळे: भारतात

कमवतोय कुठे? – सगळे: भारतात

एवढं सगळं ज्या देशात आपण करतो, तो देश म्हणे एका पुस्तकावर चालतो. ते कायद्याचे पुस्तक म्हणजे संविधान. जसे शाळा चालवायला नियम असतात तसे देशाचा कारभार चालवायला सुद्धा नियम पाहिजे. देशातील सर्व लोकासांठी नियम संविधानात आहे.

**सगळे: सर्व म्हणजे सर्व लोकांसाठी का?**

.............. – हो सर्व म्हणजे सर्व म्हणजे सर्व लोकांसाठी – हिंदू, मुस्लीम, सिख, इसाई, बौद्ध सर्व धर्मासाठी .. सर्व जातीच्या लोकांसाठी यात नियम लिहिले आहेत.

.............. – विद्यार्थ्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी, कामगारांसाठी, महिलांसाठी सर्वांसाठी हक्क आणि अधिकार यात दिले आहेत

**सगळे: सर्वांना देई दर्जा समान, संविधानाचे काम महान**

## - सीन 2 -

(*मुलीच्या छेडछेडीचा सीन*)

.............. – थांबा, थांबा, थांबा!

.............. – का म्हणून?

.............. – अगं तुला दिसत नाही मी तुझी वाट आडवली आहे.

.............. – तू कोण रे माझी वाट आडवणारा?

.............. – मी कोण, मी मुक्या? पक्याचा मित्र

.............. – कोण पक्या ?

.............. – तुला पक्या माहित नाही?

.............. – एss पक्या इकडे ये. अरे हे बघ; ही तुला ओळखत नाही म्हणे.

.............. – तु मला ओळखत नाही! मी पक्या पोरींच्या दिलाचा राजा.

.............. – ए बस झालं तुमचं नाटक! मुकाट्यानं बाजूला होता का...नाही तर...!

.............. – आणि नाही झालो तर...?

*मुलगी कानाखाली मारते!*

.............. – अरे देवा मारलं मला!

.............. – तु माझ्या मित्राला मारलसं! एव्हढी हिम्मत?

.............. – हो आणि तु मध्ये आलास तर तुला पण देईन ठेऊन एक! आणि दोघांनी जास्ती शानपना केला ना तर डायरेक्ट पोलीसात अन् तिथून सरळ जेलमध्ये!

.............. – आम्हला अन् जेलमध्ये? आएला एव्हढी हिम्मत!

.............. – मग तुला काय वाटलं. हिम्मत फ़क्त काय पुरूषांकडेच असते की काय? आरे फ़क्त माझं सोड, इथे उभ्या असलेल्या प्रत्येक मुलीत हिम्मत आहे. फ़क्त त्यांना माहित नाही की हि हिम्मत आपल्याला संविधानाने दिली आहे. सांग गं..!

.............. – संविधानातील भारतीय न्याय संहिता-354 नुसार मुलींची छेडछाड किंवा विनयभंग करणे हा गुन्हा आहे. अश्या गुन्ह्यासाठी पोलीसात तक्रार दिली तर त्यासाठी तुला जेल होऊ शकते.

.............. – ऐकलं काय..!

.............. – इतकच काय नवऱ्याने जरी बायकोला मारहाण केली तरी बायको पोलीसात तक्रार करू शकते आणि नवऱ्याला जेलमध्ये पाठवू शकते.

*दोघे मित्र आपसात बोलतात* – चल चल लेका, नाय तर आणि हानल आपल्याला!

.............. – संविधानाने महिलांना नुसती हिम्मतच नाही दिली तर स्वातंत्र्यापूर्वी चूल आणि मूल मध्ये अडकून पडलेल्या महिलेला आत्मसन्मान मिळवून दिला.

**- सीन 3 -**

.............. – सेल.. सेल.. सेल..

सेल.. सेल.. सेल..

**सगळे: कसला सेल? साड्यांचा सेल?**

.............. – नाही नाही. नवऱ्या मुलांचा सेल.

आपापल्या जातीतला नवरा शोधण्याची शेवटची संधी.

चांगला नवरा शोधण्याची शेवटची संधी.

त्वरा करा, त्वरा करा, त्वरा करा.

सेल.. सेल.. सेल..

**आई** – अगं बाबे चल लवकर.

**बाबी** – अगं पण कुठे?

**आई** – अगं कुठे म्हणून काय विचारतेस? नवऱ्या मुलांचा सेल लागलाय. चल लवकर.

*(तमाश्यासारखी रंगमंचावर फेरी मारतात.)*

**आई** – काय भाव आहे?

**मुलगा 1** – महाग आहे. परवडायचा नाही तुम्हाला

**आई** – अहो, परवडेल की नाही, हे आमचं आम्ही पाहू. तुम्ही आधी किमंत तर बोला.

**मुलगा 1** – किंमत २५ लाख रुपये

*(दोघीजणी त्याला वरपासून खालपर्यंत न्याहाळतात)*

**आई** – अहो, ह्यात एवढं विशेष आहे तरी काय?

**मुलगा 1** – आय.टी. ईजिनीयर आहे. तरी बरं, डोनेशन द्यायला लागलं नाही. नाही तर अजून ४-५ लाख तरी वाढले असते.

**आई** – नाही बाई परवडायचं. चल बाबे, आपण दुसरीकडे जाऊ.

काय भाव आहे?

**मुलगा 2** – काहीच नाही पण तुम्ही लग्नात कपाट, कॉट, फ्रीज, कार आणि ५० तोळे सोने तुमच्या मुलीला देणारच ..म्हणून काही नको.

**आई** – चल बाबे चल नंतर बघू आपण

**बाबी** – आई का गं मुलं एवढा हुंडा घेतात

**आई** – बाबे तू शिकली नाहीस का एवढी ..इंजिनियर झाली नसती तर लग्न लवकर झाल असतं.. एकदाचं लग्न झालं की माझ्या डोक्यावरच कर्ज फिटल बघ ..

**बाबी** – अगं आई मी काय ओझं आहे का ग? मी नोकरी करणार आणि पायावर उभी राहणार.

*नको गं, माय जल्दी लगीन करू नको*
*नको रं, बाबा जल्दी लगीन करू नको*
*बला म्हणू नको, माझी चिंता करू नको*
***पिढ्यानं पिढ्या माय बापानं, वनवास भोगिला***
*राब राबुनी घाम गाळुनी, शिकविलं हो मला*
*नाही अबला शिकून माये, दावीन मी जगाला*
*पंख छाटू नको, पिंजऱ्यात ठेऊ नको नको गं माय..*
*नको रं बाबा..*
***जोती सावित्री जन्माला आले, शिक्षण केले खुले***
*महिला आणि दलितांच्या, पंखाला बळ मिळाले*
*शिकण्यासाठी लढण्यासाठी घटनेत हक्क मिळाले*
*शिकू दे ग माय, जग कळू दे ग माय*

*नको गं, माय..*

*नको रं, बाबा..*

हुंडा देणे हा कायद्याने गुन्हा आहे, मी देणारही नाही आणि घेणारही नाही.

............... – **पैसा हवा पण मुलीच्या लग्नासाठी की शिक्षणासाठी?**

**सगळे: शिक्षणासाठी**

**बाबी** – आई, हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा आहे, मी हुंडा देणारही नाही आणि घेणारही नाही.

**- सीन 4 -**

............... – या देशाच्या संविधानामुळे आज महिलांसाठी शिक्षणाची दारं खुली झाली.

............... – मला सांगा, लग्नाच्या आधी मुलीच्या नावापुढे काय लागतं ?

**कोरस: कुमारी**

............... – लग्नानंतर मुलीच्या नावापुढे काय लागतं?

**कोरस: सौभाग्यवती**

............... – आणि विधवा झाल्यास?

**कोरस: श्रीमती**

............... – असेच वर्षानुवर्षे लागत होते-आहे पण आज महिलेच्या नावापुढे काय काय लागते?

**सगळे: डॉक्टर, इंजिनियर, वकील, पोलीस, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री राष्ट्रपती**

............... – फक्त शिक्षण आणि नोकरीच नाही तर समान कामाला समान पगार, म्हणजे एकाच कामासाठी पुरुषाला आणि बाईला वेगवेगळा पगार नाही. दोघांनाही सारखा पगार.

............... – संविधानामुळेच आम्हा महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.

............... – तुम्हाला माहित नसेल म्हणून सांगते. भारत हा जगातील पहिला असा देश आहे ज्याने स्वातंत्र्य मिळाल्यावर संविधान लागू झाल्यावर लगेचच महिलांना मतदान करण्याचा अधिकार दिला

............... – महिलांना मतदानाचा अधिकार आहे म्हणून बरं झालं बाई. नाहीतर आम्हा महिलांकडे कुणी ढुंकून सुद्धा पाहिलं नसतं.

............... – भारतीय संविधानाने दिलेल्या या अधिकारामुळे आज प्रत्येक महिला सन्मानाने जगू शकते. बाईला माणूसपण दिलं संविधानाने.

............... – आला का लक्षात संविधानाचा जागर?

**सगळे – हो.. हो ..**

............... – **आधी महिला कशाच्या जात्यावर ओव्या दळायच्या. तसं आता जर एखाद्या महिलेला** संविधानावर ओवी म्हणायची असेल तर ती काय बोलेल बघा…

*बाई संविधान जाणते बाई संविधान बोलते*
*संविधान ऐकाया तू ये रे बा विठ्ठला*

*संविधान वाचीले, हक्क, हक्क वेचीले*
***माळ त्याची कराया तू ये रे बा विठ्ठला (**सगळे**)***

*ओटी भरली समतेनं, ओटी भरली न्यायानं*
***स्वतंत्र बाई बघाया, तू ये रे बा विठ्ठला***

*ईडापीडा टळली, पिळवणूक जळली*
***कळसातून बघाया तू ये रे बा विठ्ठला***

*तू ये रे बा विठ्ठला, तू ये रे बा विठ्ठला (सगळे)*
*तू ये रे बा विठ्ठला, तू संविधान ऐकाया (सर्वांनी मिळून दोन वेळा)*

*घरदार लाभले, दासीपण सुटले*
***सात-बारा बघाया तू ये रे बा विठ्ठला***

*गावही चालवते, देशही चालवते*
***हक्काच्या वारीला तू ये रे बा विठ्ठला***

*संविधान जाणते, बाई संविधान बोलते*
***संविधान जाणते, बाई संविधान बोलते***

*संविधान ऐकाया तू ये रे बा विठ्ठला (सर्वांनी मिळून दोन वेळा)*
***तू ये रे बा विठ्ठला, तू ये रे बा विठ्ठला,***
***तू संविधान ऐकाया, तू संविधान ऐकाया (सर्वांनी मिळून दोन वेळा)***

............... – तेव्हा आपला स्वाभिमान आणि राष्ट्राचा सन्मान राखण्यासाठी येत्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त आपण सर्वजण मिळून शपथ घेऊ या!

*(मी म्हणेन तुम्ही सगळ्यांनी तेच वाक्य माझ्या मागं म्हणायचं )*

मी संविधानामध्ये दिलेल्या मूल्यांचे पालन करेन.

मी कोणत्याही व्यक्तीचा द्वेष करणार नाही.

मी लोकांमध्ये एकता-बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न करेन.

मी महिलांचा आदर करेन आणि कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही.

मी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद यांचा प्रसार करेन.

मी सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करेन व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करेन.

संविधानाचे पालन करणे हीच खरी देशभक्ती आहे, असे मी मानतो. त्यामुळे, संविधानाचे पालन करून मी खरा देशभक्त बनेन.

जय संविधान!

भारतीय संविधानाचा विजय असो!

भारतीय संविधानाचा विजय असो!